# कुष्ठ  रोगापासून स्वतःला कसे वाचवावे

-डॉ. जोएल अलमेडा  (एम.बी.बी.एस., पीएच.डी.)

कुष्ठरोग  हा  जिवाणूंपासून  होतो, आणि तो बरा होऊ शकतो. भारतातील कोणताही सामाजिक आणि आर्थिक वर्ग यापासून  सुरक्षित नाही. कुष्ठरोगापासून आपला बचाव कसा करावा हे समजणे अत्यंत महत्वाचे आणि आवश्यक आहे.

भारतात बालके आणि प्रौढांमध्ये दर काही मिनिटाला कुष्ठरोगाचा एक नवीन रुग्ण सापडत आहे. या रोगाने व्यक्ती अकार्यक्ष होण्यापूर्वी त्यावर उपाय करण्याच्या  दृष्टीने  हे  चांगले  आहे.  भारतातून  कुष्ठरोग पूर्ण नष्ट झाला  आहे, असा दावा चुकीचे आणि आरोग्याच्यादृष्टीने घातक आहे. कोणत्याही रोगाचे पूर्ण उच्चाटन म्हणजे त्या प्रदेशात त्या रोगाचा एकही नवा रुग्ण न सापडणे, असे W.H.O. जागतिक आरोग्य संघटनेने २०१३ मधील आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे.

भारतात पुढील दशकांत सुमारे दहा लाख लोकांमध्ये कुष्ठरोगाची चिन्हे, लक्षणे  नव्याने  दिसण्याची  शक्यता आहे. जर तुम्ही भारतातील एका शहरात राहत असाल, तर विचार करा की, तुमच्या घरासभोवती असणाऱ्या २५ मोठ्या इमारतींमधील १००० लोक रहात असतील. त्या मधून जवळपास एक नवीन कुष्ठ रोगी एका दशकात तयार होण्याची शक्यता   आहे.   सध्या ज्या लोकांमध्ये कुष्ठरोगाची लक्षणे दिसत आहेत, ते हिमनगाचे एक टोक आहे. पुढील दहा वर्षांत सुमारे २  ते दहा कोटी भारतीयांना कुष्ठरोगाची लागण होण्याचा धोका आहे. मात्र, त्यांच्यामध्ये कुष्ठरोगाची लक्षणे दिसणार नाहीत.

कुष्ठरोगाचे जिवाणू कोरड्या ठिकाणी किमान पाच महिने जिवंत राहू शकतात. जेव्हा त्यांना पुन्हा एखादा वाहक मिळतो, तेव्हा त्यांची संख्या दुप्पटीने वाढते. चीनमधे गरीबीच्या निर्मुलनामुळे शान्डोंग तालुकात वर्षाला दहा टक्के कुष्ठरोगी  पन्नास वर्षापूर्वी कमी झालेत; आणी हेच नॉर्वे मध्येही आढळून आले  जवळपास शंभर  वर्षापूर्वी. भारतात मात्र ह्याउलट परिस्थिती आहे. इथे २००८-९ आणि २०१३-१४ ह्या दरम्यान निदान आधी विद्रूपपणा असलेल्या रोग्यांची संख्या वाढल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणून शहरातील व गावातल्या वस्तीमधील गरीबीचे निर्मुलन हे श्रीमंतांच्या देखील हिताचे आहे.

कुष्ठरोगावर योग्य उपचार न झाल्यास त्याचा परिणाम आपल्या मज्जातंतू आणि  संवेदनावर होतो. हाताची बोटे, तळवे, पाय आणि डोळयांना हळूहळू जखमा होण्यास प्रारंभ होतो. कातडीबरोबरच चेतातंतूंवरही हा दृष्परिणाम करतो. कातडीवर    न खाजणारे चट्टे व बधिरता येते. भाराचा आभास नसल्याने हाताची बोटे, पाय, ह्यामधे झालेल्या जखमा भरत नाहीत. हाथापायांच्या मांसपेशींवर परीणाम होऊन हातांची बोटे आणी पावलांचा वापर करण्यात पण त्रास होतो,  डोळा बंद न करता येणे अशी लक्षणे दिसतात. त्यासाठी कायमचे नुकसान होण्याआधीच या रोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखून उपचार व्हायला पाहिजेत. म्हणून आजार वाढेपर्यंत थांबू नका, लगेच इलाज करा.

जर तुमच्या अंगावरील एखादा  असा चट्टा की, ज्याच्यावर बॉलपेन टोचले तरी कोणतीही संवेदना होत नाही किंवा तुमच्या कानाच्या पाळया नेहमीपेक्षा जाड झाल्या असतील किंवा तुमच्या हाताची बोटे सरळ करण्यास कष्ट पडत असतील किंवा हाथापायांत वेदनारहित जखमा होत  असतील तर जवळच्या सरकारी रुग्णालयात जाऊन लवकर मोफत तपासणी व रोगाचे योग्य निदान  करावी.  तसेच तुमच्यामध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळली तर एमडीटी (मल्टी ड्रग थेरपी) निशुल्क इलाज पण होईल. जर तुमच्यात कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यास तुम्ही तुमच्या संपूर्ण कुटुंबाची तपासणी करुन  घेणे जरुरीचे ओह. तुमच्या संपूर्ण कुटुंबालाही याची लागण झालेली असू शकते.

एमडीटी (मल्टी ड्रग थेरपी) इलाज कुष्ठरोगाचे जंतू तातडीने नष्ट करण्याचे काम करते. या उपचार पद्धतीमुळे संसर्गजन्य कुष्ठरोगाचा प्रसार थांबण्यास मदत होते. पण हा इलाज मज्जातंतू नुकसान प्रतिबंधित करण्यासाठी पुरेसा  होत नाही.

एमडीटीचा वापर सुरु केल्यानंतर पहिल्या दोन वर्षात मज्जातंतूमध्ये बिघाड होण्याचा संभव असतो. ह्याचे  कारण म्हणजे आपल्या शरीराच्या प्रतिकार शक्तीने कुष्ठरोगाच्या किटाणूवर हमला केलेला असतो.  या लढाईमुळे मज्जातंतू

मारले जातात. हे सर्व लक्षात यायला खूप वेळ लागतो आणी तोपर्यन्त शरीरामधील मज्जातंतूवर कायमचे दुष्परिणाम होऊ शकतात.

कुष्ठरुग्णावर एमडीटी उपचार सुरु केल्यानंतर पहिल्या दोन वर्षात प्रत्येक महिन्याला मज्जातंतूची तपासणी करणे गरजेचे असते. यासाठी तज्ज्ञ व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. असले सहायक तज्ज्ञ पूर्वी उपलब्ध होते. कुष्ठ रोग आता भारतात नष्ट झाला आहे अशा चुकीच्या व अकाली दाव्यामुळे असे तज्ज्ञ आता उपलब्ध नाहीत. सहायक तज्ज्ञ तुमच्या मज्जातंतूवर होणारे विपरीत परिणाम लवकर ओळखून त्यावर जरूरी इलाज करून व रोखून कायमचे अपंगत्व येण्यापासून वाचता येते. भारतीय कुष्ठ रोग कार्यक्रमांतर्गत देण्याच आलेली ही एक स्वस्त व प्रभावी उपचारपद्धती आहे.

ज्या कुष्ठारोगांच्या शरीरावर हे उपाय झाले आहेत व जरी त्यांच्या शरीरावर कुष्ठरोगाची बाह्या लक्षणे दिसत असतील तरी बहुतांशवेळ ते असंसर्गजन्य असतात. ते तुमच्या - आमच्यासारखेच सर्वसामान्य असतात. फक्त त्यांच्या मज्जातंतू कुष्ठरोगाच्या जंतुमुळे प्रभावित झालेल्या असतात. कुष्ठरोगाचे किटाणू कधीच मारले गेलेले असतात. इतर लोकांना दिल जाणार आदर व प्रेम आपण आता अशा लोकांनाही देऊ शकतो. कदाचित, तुम्ही ती व्यक्ति असू शकता. जर तुमच्या अंगावर कुष्ठरोगाची बाह्य लक्षणे दिसत असतील, तर भारतीय कुष्ठरोग कार्यक्रमांतर्गत तुमच्यावर शस्त्रक्रिया व पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत उपचार उपलब्ध केले जातात. मज्जातंतूवर झालेल्या परीणामामुळे शरीरात आलेले अपंगत्व हे शास्त्रक्रियेनेच बरे होऊ शकते. म्हणून मदत घेणे जरुरीचे असते.

## तुम्ही कसा बदल घढवू शकता

स्वतःचे व स्वतःला जवळ असलेल्या व्यक्तीचे कुष्ठरोगापासून संरक्षण करण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता. तुम्ही तुमच्या स्थानिक खासदार, आमदार, पंचायत सदस्य, नगरसेवक, यांना पत्र लिहून याबद्दल माहिती द्या. राष्ट्रीय
कुष्ठरोग कार्यक्रमांतर्गत उपचार मिळवून देण्यासंदर्भात त्यांना विनंती करु शकता. त्याचबरोबर प्रभावी दाह विरोधी उपचारपद्धती संदर्भातही त्यांच्याकडे आग्रह धरण्याची विनंती करु शकता. तुम्ही त्यांना खालील गोष्टी कळवा.

१) जागतिक आरोग्य संघटनेने (W.H.O.) २०१३ मध्ये केलेल्या व्याख्येनुसार भारतातून कुष्ठरोगाचे संपूर्ण उच्चाटन झालेले नाही. या उलट येत्या दहा वर्षात नव्याने दहा लाख लोकांमध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळतील. ह्यात राजकारणात असलेले व्यक्ति, त्यांचे कुटुंब व त्यांची मित्रमंडळी ह्यानासुद्धा धोका आहे. म्हणून भारतात कुष्ठरोगाच्या वरील भक्कम कार्यक्रमाचा अमलबजावणीत सर्वांचाच फायदा आहे.

२) कुष्ठरुग्णावर एमडीटी (मल्टी ड्रग थेरपी) सुरु केल्यानंतर पहिल्या दोन वर्षात रुग्णाचे निरीक्षण करण्यासाठी कुशल व तज्ज्ञ कर्मचाऱ्यांनी नियुक्ती करणे गरजेचे आहे. अन्यथा मज्जातंतूना लागणार संरक्षण उपचार वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे दरवर्षी हजारो भारतीय नव्याने दृश्य स्वरुपात कुरूप होऊ शकतात.

हे लिहिल्यामुळे तुम्ही आणि तुमचे कुटुंबिय
व मित्र सुरक्षित राहू शकता.

------------------------------------------------------------

हा लेख एक भारतीय मेडिकल कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन चर्चेतून घेण्यात आला आहे. या लेखाच्या अगोदरचे मसुदे पुढील दिलेल्या संस्थाना पाठविले होते - जागतिक आरोग्य संघटना (W.H.O.), आंतरराष्ट्रीय रोग महासंघ, निप्पॉन फाउंडेशन, नोव्हार्टिस फाउंडेशन, कुष्ठरोगावर काम करणारे जगभरातील तज्ज्ञ व सामाजिक बांधिलकी असणारे भारतातील डॉक्टर्स यांच्याशी यासंदर्भात. या लेखात प्रदर्शित झालेली मतांची जबाबदारी ही संबंधित लेखकाची आहे.